Har Ghar Jal
Jal Jeevan Mission

# स्वारस्यअभिव्यक्ती (EOI)

## जल जीवन मिशन मध्ये कार्यान्वयन सहयोगी संस्था म्हणून काम करू इच्छिणा-या संस्था कडून विहीत नमून्यात सूची तयार करणे साठी आवेदन

---

जल जीवन मिशन करीता, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM)यांचे कडून सार्वजनिक पाणी पुरवठा या क्षेत्रात काम करणा-या अशासकिय संस्था/स्वंयसेवी संस्था/स्वयं-सहायता समूह /सामुदायिक संघटन/ विविध विश्वस्त संस्था/ विविध प्रतिष्ठाने, इत्यादी संस्था, ज्यांना ग्रामपंचायती/ ग्रामीण पाणी पुरवठा समिती यांना जल जीवन अभियाना मधील कार्यान्वयना साठी सहयोग देण्याची इच्छा असेल, त्यांचा अर्ज जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद, वाशिम येथे सादर करावेत. या बाबतीतील कामाचे प्रारूप/ अटी व शर्ती व अर्जाचा नमूना https://zpwashim.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

अर्जदाराला जलजीवन मिशन पोर्टलद्वारे (Ref:http://ejalshakti.gov.in/JJM/JJM/public/frm_SelfRegistration.aspx) येथे नोंदणी करावी लागेल.

**-स्वा-**
**मुख्य कार्यकारी अधिकार**
**जिल्हा परिषद वाशिम**

**अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख 17/ 02/2022 सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत**

**दिनांक**

प्रति,

प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
जिल्हा परिषद, **वाशिम**

विषय:- जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत अंमलबजावणी सहाय्य संस्थांची निवडसूची तयार करणे बाबत प्रस्ताव.

संदर्भ :- ............. वरील कामासाठी दिनांक...........2022 रोजी https://zpwashim.in या संकेत स्थळा वर प्रकाशित झालेली आपली जाहिरात

महोदय,

जल जीवन मिशनच्या अंमलबजावणीसाठी आमची संस्था ग्राम पंचायातीला / पाणी पुरवठा वस्वच्छता समितीला "अंमलबजावणी सहाय्य संस्था" म्हणून सहाय्य करू इच्छिते.आम्ही सर्व आवश्यक तपशीलांसह वरील कामासाठीचा प्रस्ताव सादरकरीत आहोत.

या प्रस्तावातील सर्व माहिती आणि विधानं खरी आहेत असं आम्ही घोषित करतो.

आपले विश्वासू,

......................

---------------

| | |
|---|---|
| अधिकृत स्वाक्षरी (संपूर्ण नांव व पत्ता) | |
| स्वाक्षरी करणाऱ्याचे नाव व पद | |
| संस्थेचे नाव | |
| पत्ता | |

२.0 **संस्थेची प्राथमिक माहिती**

(खालील प्रपत्रात आपल्या संस्थेची मुलभूत माहिती द्यावी)

२.१ संस्थेची सर्वसाधारण माहिती

| अनुक्रमांक | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | **संस्थेचे नाव** | |
| २ | **कायदेशीर दर्जा** | |
| २.१ | अशासकीयसंस्था / स्वयंसेवी संस्था / बचतगट / समुदायसंचलितसंस्था / विश्वस्थसंस्था | |
| २.२ | नोंदणीचे तपशील - नोंदणी क्रमांक व कायदा | |
| २.३ | नोंदणीची तारीख (कृपया प्रमाणपत्र आणि माहितीपत्र जोडावे) | |
| ३ | **पत्ता, दूरध्वनी क्र. / मोबाईल क्र., ईमेल, संकेतस्थळ इ.** | |
| ४ | **कामाचे क्षेत्र** | |
| ४.१ | क्षेत्रीय कार्यालय / कार्यालयांची संख्या | |
| ४.२ | क्षेत्रीय कार्यालय / कार्यालयांचे ठिकाण | |
| ५ | **संपर्क व्यक्तीचे तपशील** | |
| ५.१ | नावः | |
| ५.२ | | |
| ५.३ | संपर्क क्र.: | |
| ६ | **ग्रामीण पिण्याच्या पाणी पुरवठा क्षेत्रातील संबंधितील अनुभव** | |
| ७ | **आपल्या संस्थेची नोंदणी जल जीवन मिशनच्या संकेतस्थळावर झाली आहे का?** (**हो असल्यास तपशील द्यावेत**) | |

**२.२ प्रमुख सेवा**

(आपल्या संस्थेने आतापर्यंत विविध विकास-कार्यक्रमांमध्ये पुरविलेल्या सेवांचं वर्णन करावं)

| **क्र.** | **सेवेचा प्रकार** | **हो / नाही** | **हो असल्यास कृपया खालील आकड्यांसह तपशील द्यावेत** (एकूण आयोजित कार्यक्रम / एकूण आयोजित उपक्रम / किती गावांमधे उपक्रम आयोजित केले इ.) |
|---|---|---|---|
| १ | **माहिती शिक्षण संवाद आणि क्षमता बांधणी** | | |
| २ | **गावपातळीवरील संस्थांचे / समुदायाचे संघटन व बळकटीकरण** | | |
| ३ | **प्राथमिक सर्वेक्षण** (Baseline survey) | | |
| ४ | **प्रशिक्षणाची आखणी** | | |
| ५ | **प्रशिक्षणाचे आयोजन आणि सुलभीकरण** | | |
| ६ | **पाणी पुरवठा योजनेच्या निश्चितीसाठी सहभागीय गाव अभ्यासाचे आयोजन व अहवाल** | | |
| ७ | **वर्तणूक बदलाच्या उपक्रमांचे आयोजन आणि आखणी** | | |
| ८ | **आर्थिक व्यवस्थापनासाठी ग्राम पंचायातीला / पाणी पुरवठाव स्वच्छता समितीला केलेली मदत** | | |
| ९ | **समाजाभिमुख पाणी पुरवठा योजनेसाठी केलेलं सुलभीकरण** | | |
| १० | **माहित शिक्षण सवांद अंतर्गत देण्यात आलेल्या गृहभेटीचा तपशील** | | |
| ११ | **अन्य (स्पष्ट करा)** | | |

**२.३ संस्थेकडे उपलब्ध असलेले तज्ञमनुष्यबळ**

(उपलब्ध असेलल्या मनुष्यबळांचे तपशील द्यावे)

| **क्र.** | **तज्ञांची वर्गवारी** | **तज्ञांची संख्या** | **क्र.** | **तज्ञांची वर्गवारी** | **तज्ञांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | ५ | | |
| २ | | | ६ | | |
| ३ | | | ७ | | |
| ४ | | | ८ | | |

**३.0 संस्थेचे तपशील**

(संस्थेची थोडक्यात माहिती, हाताळलेले उपक्रम, प्रस्तावित कामाची समाज आणि सदर काम पूर्ण करण्यासाठी संस्थेची क्षमता)

**४.0 संस्थेचा अनुभव**

(पाणी पुरवठा आणि स्वच्छता क्षेत्रात, संस्थेने मागील १० वर्षात केलेल्या कामाचा अनुभव खालील प्रपात्राद्वारे द्यावा)

| **अनुक्रमांक** | **कामाचे नाव** | **कालावधी** | **ग्राहक** (**Client**) | **स्तर** (**राष्ट्रीय / राज्य / जिल्हा / तालुका / ग्रा.पा.**) | **लक्षित गट** | **कामाचे ठिकाण** (**जिल्हा आणि तालुका**) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| 3 | | | | | | |

**५.0 कामासाठी प्रस्तावित केलेल्या चमूचा तपशील**

(खालील प्रपात्राप्रमाणे प्रस्तावित चमूचा तपशील द्यावा)

५.१ प्रस्तावित कर्मचाऱ्यांचे तपशील

| अ.क्र | पद | नाव | शिक्षण | प्राविण्य | अनुभव (वर्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प व्यवस्थापक | | | | |
| २ | स्थापत्य/ पर्यावरण अभियंता | | | | |
| 3 | वरिष्ठ समाज शास्त्रज्ञ (IEC/CB) | | | | |
| 4 | क्षेत्रिय सुलभकर्ता-1 | | | | |
| 5 | क्षेत्रिय सुलभकर्ता-2 | | | | |
| 6 | क्षेत्रिय सुलभकर्ता-3 | | | | |
| 7 | क्षेत्रिय सुलभकर्ता-4 | | | | |
| 8 | लेखापाल | | | | |
| 9 | अन्य ( स्पष्ट करा) | | | | |

**५.२ खालील प्रपत्राप्रमाणे प्रस्तावित कर्मचाऱ्यांचा थोडक्यात बायोडेटा आणि छायांकित शैक्षणिक अर्हता मार्क सिट, अनुभवाचे प्रमाण पत्रासह जोडावा.**

अ. तपशील

| | | |
|---|---|---|
| 1 | कर्मचाऱ्याचं नावः | |
| 2 | जन्म तारीखः | |
| 3 | प्रस्तावित पदः | |
| 4 | अनुभव (वर्ष) : | |
| 5 | विशेष प्राविण्य : | |

ब. प्रमुख शैक्षणिक पात्रता

| अ.क्र. | पदवी | विद्यापीठ | वर्ष | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

क. या पूर्वी केलेल्या कामाचा तपशील (कामाचं स्वरूप, संस्थेचं नाव आणि कार्यकाल)

ड. अवगत भाषा

| भाषा | वाचन | लेखन | संवाद |
|---|---|---|---|
| **मराठी** | | | |
| **हिंदी** | | | |
| **इंग्रजी** | | | |

**अधिकृत व्यक्तीची स्वाक्षरीसह**

6.0 **संस्थेने कोणत्याही जिल्ह्यामध्ये काम करण्याची तयारी असावी**

7.0 **संस्थेची आर्थिक क्षमता**

(खालील प्रपत्रात संस्थेची मागील तीन वर्षांची आर्थिक उलाढाल नमूद करावी)

| वर्ष | 2018-2019 | 2019-2020 | 2020-2021 |
|---|---|---|---|
| **वार्षिक उलाढाल (लाखात)** | | | |

वरील प्रमाणे मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल व आयकर पावतीसह सोबत जोडाणे आवश्यक आहे.

8.0 **कागदोपत्री पुरावे - नोंदणी प्रमाणपत्र आणि इतर**

(कृपया जोडा - संस्था नोंदणी प्रमाणपत्र, कार्यारंभ आदेशसह कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे, मागील तीन वर्षांचा लेखापरीक्षण अहवाल, आयकर भरल्याचे प्रमाण पत्र आणि प्रस्तावित मनुष्यबळाचा बायोडेटासह छायांकित शैक्षणिक अर्हता दस्तऐवज व अनुभवाचे प्रमाण पत्र इ.)

## जल जीवन मिशन अंतर्गत अंमलबजावणी सहाय्य संस्थाची निवडसूची तयार करणे

### १. प्रस्तावना :

केंद्र शासनाने नुकतेच जल जीवन मिशन कार्यक्रमाला सुरुवात केलेली असून सन २०२४ पर्यंत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला कार्यान्वित घरगुती नळ कनेक्शन देणे हे या कार्यक्रमाचेध्येय आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातूनघरगुती स्तरावर वर्षभर प्रति माणसी प्रति दिवस ५५ लीटर या प्रमाणे सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे मुख्य लक्ष आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या सुविधा शाश्वतरीत्या टिकण्यासाठी नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती या सर्व टप्प्यात समुदायाची मालकी व लोकांचा सक्रीय सहभागअसणे हा कार्यक्रमाचा मुख्य आधार आहे. सर्व सुविधा चिरकाळ टिकतील याची खात्री करण्यासाठी गावातील लोक व विविध समित्या, संस्था यांची योजनेच्या प्रत्येक टप्प्यात म्हणजेच नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती टप्प्यात प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमता वृद्धी करणे हे एक महत्वाचे काम आहे. योजनेचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रकल्प काळात लोकांना व गावपातळीवरील संस्थांना सातत्यपूर्ण सहाय्य करणे महत्वाचे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमाचीव्याप्ती, त्याचा विस्तार तसेच योजना निश्चित कालावधीत पूर्ण करणे इत्यादीचा आवाका पाहता शासनाने ग्रामपंचायत / ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांना अंमलबजावणी दरम्यान सहाय्य करण्यासाठी अंमलबजावणी सहाय्य संस्था यांची निवडसूची तयार करण्याचे निश्चित केले आहे. एका सहाय्यकारी संस्थेकडे १२ ते १८ महिन्याच्या कालावधीसाठी प्रकल्प चक्रातील कामे करण्यासाठी जिल्ह्यातील एकाच वेळी ४० गावे देण्यात येतील.

### २. अंमलबजावणी सहाय्य संस्थेची आवश्यकता :

जल जीवन मिशन योजनेचे प्रमुख वैशिष्ट म्हणजे, पाणी पुरवठा सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी, व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती दरम्यान गावाची मुख्य भूमिका राहील. योजनेच्या प्रत्येक टप्प्यात लोकांचा सहभाग अनिवार्य असून यामध्ये कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही. त्यापैकी काही महत्वाची कामे जसे, जल जीवन मिशन राबविण्याबाबत लोकांची मागणी, गाव कृती आराखडा लोकसहभागाच्या मदतीने तयार करणे, पाणी पुरवठा योजनेचे स्त्रोत पर्याय निश्चिती करणे, उपांगांसाठी लागणाऱ्या जमिनीबाबत करावयाची प्रक्रिया, पाणी पुरवठा सुविधेच्या भांडवली खर्चाच्या १०% लोकसहभाग, सेवा वस्तू व साहित्य खरेदी, समुदायाचे संगठन, योजनेच्या कामावर देखरेख, लेखाजोखा ठेवणे, पाणी पट्टी दर निश्चिती व वसुली, जनजागृती कार्यक्रम राबविणे, पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती, सांडपाणी व्यवस्थापन करणे इ. कामे लोकसहभागाच्या माध्यमातून केली जातील.जल जीवन मिशन गावस्तरावर राबविण्यासाठी जिल्हा व राज्य स्तरावरील विविध यंत्रणा सहाय्य करतील.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध प्रकारची बहुआयामी कामे करावयाची असल्याने त्यांच्याकडे त्या अनुषंगाने कौशल्ये व क्षमता असलेला कर्मचारी असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा व ग्रामपंचायत स्तरावरील भागधारकांसोबत समन्वयामध्ये वाढ करणे व नियोजन करणे, निविदा प्रक्रिया व संनियंत्रण करण्याची सुध्दा आवश्यकता आहे. पुढील ४ वर्षे इतक्या कमी कालावधीत सर्व घरांना कार्यान्वित घरगुती नळ कनेक्शन पुरविणे हे एक मोठ्या प्रमाणात काम आहे.

जल जीवन मिशनच्या निश्चित कालावधीतील अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत / ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जिल्हा स्तरावरील भागधारकांना सहाय्य करण्यासाठी पूर्ण वेळ काम करणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाच्या माध्यमातून अंमलबजावणी सहाय्य संस्थेची निवडसूची तयार करण्यात येईल. अंमलबजावणी सहाय्य संस्था प्रामुख्याने जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्यातील समन्वयाची भूमिका पार पाडेल व ग्रामपंचायत कार्यक्षमतेने काम करेल यासाठी वेळोवेळी सहाय्य करेल.

### ३. अंमलबजावणी सहाय्य संस्थेचे उद्दिष्ट :

अंमलबजावणी सहाय्य संस्थेची निवड करण्याचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे .....

- ज्या गावाची पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहे त्या गावामध्ये जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी मदत करणे

- योजनेचे नियोजन, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी, योजना अंमलबजावणीसाठी, योजनेचे व्यवस्थापन, देखभाल दुरुस्ती, बहिर्गमन तसेच योजना हस्तांतरण प्रक्रिया करण्यासाठी गावाचे संगठन व प्रत्यक्ष योजनेच्या सहभागासाठी प्रवृत्त करणे.
- जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद व ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, यांच्यातील एक समन्वयाचा दुवा म्हणून काम करणे.
- पंचायत राज संस्थेतील सदस्य त्यांच्या भूमिका सक्षमपणे पार पाडतील यासाठी त्यांची क्षमता वाढविणे.
- केंद्र शासन व राज्य शासन यांनी सुरु केलेल्या पाणीव्यवस्थापन मोहिमेदरम्यान गावाला सहाय्य करणे
- यशस्वी गाथा(Best practice) व दस्तावेजीकरण करणे.

**४. कामाची व्याप्ती :**

अंमलबजावणी सहाय्य संस्थेने ४० गावांमध्ये समूहात १२ ते १८ महिने करावयाच्या कामाची व्याप्ती पुढीलप्रमाणे .....

**पूर्व नियोजन टप्पा –**

- घरगुती नळ कनेक्शन संदर्भातील उपलब्ध माहितीची पडताळणी व अंतिमीकरण करणे
  - घरगुती नळ कनेक्शन संदर्भातील माहिती गोळा करणे
  - शासकीय तालुका / जिल्हा स्तरावरील नेमणूक केलेल्या नोडल अधिकाऱ्याच्या सहाय्याने व शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार माहितीची नोंद करणे.
- जिल्ह्यासोबत काम करताना ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तसेच आवश्यकतेनुसार पिण्याचे पाणी उपभोक्ता गट यांचे मजबुतीकरण करणे
- नळ कनेक्शन साठी खालील समाज संगठनाची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत ...
  - घरगुती नळ कनेक्शनबाबत लोकांमध्ये इच्छुकता निर्माण करण्यासाठी गृह भेटी, कोपरा बैठका, मोहीमा व प्रात्यक्षिके आयोजित करणे
  - घरगुती नळ कनेक्शन देण्यासाठी लागणारे साहित्य व कुशल तंत्रज्ञ यांच्या उपलब्धतेबाबत तसेच यादीबाबत खात्री करणे
  - सडल पीस व फेरुलचा योग्य प्रकारे वापर करून कनेक्शन देण्यात आल्याबाबत खात्री करणे

**नियोजन टप्पा –**

- ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व उपभोक्ता गट यांची आवश्यकतेनुसार क्षमता बांधणी करणे
- ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व उपभोक्ता गट यांना खालील बाबींसाठी सहाय्य करणे
  - जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागासोबत समन्वय साधून जल जीवन मिशनच्या उद्दिष्टाबाबत लोकांना परिचीत करून देणे
  - गावात जल जीवन मिशन राबविणेबाबत ग्रामपंचायतीचा ठराव घेणे
  - पाणी व स्वच्छता संबंधित गावातील दुय्यम माहिती गोळा करणे
  - कार्यान्वित घरगुती नळ कनेक्शन उपलब्ध असल्यास त्याची खात्री करणे व ज्या कुटुंबाकडे नळ कनेक्शन नाही त्या लोकांचीनळ कनेक्शन घेण्यासाठी मानसिकता निर्माण करणे
  - सहभागी पद्धतीने व निश्चित केलेल्या माहितीच्या व आराखड्यातील मुद्द्यांच्या अनुषंगाने गाव कृती आराखडा तयार करणे
  - योग्य स्त्रोताच्या पर्यायाची निवड करून त्याचे अंतिमीकरण करणे
  - योजनेच्या उपांगांसाठी लागणाऱ्या जमिनीचा शोध घेणे व त्याला मान्यता घेऊन दान पत्र व नोंदणीकरण करण्यासाठी सुलभीकरण करणे
  - गाव कृती आराखड्याला लोकांची संमती घेणे व ग्रामसभेची मान्यता घेणे
  - योजने संबंधित समित्या व उप समित्या यांच्या वेळोवेळी बैठका आयोजित करणे
  - ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती / ग्रामपंचायत / पाणी समिती यांचे बँकेत खाते उघडणे

- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन व तत्सम शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लोक सहभागाबाबतचे चित्र स्पष्ट करणे व निश्चित केलेली रक्कम बँकेच्या खात्यात जमा करणे
- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन व तत्सम शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लोक सहभागाबाबतचे चित्र स्पष्ट करणे व निश्चित केलेली रक्कम बँकेच्या खात्यात जमा करण्यासाठी प्रक्रिया सुलभ करणे
- निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग, कार्यान्वित घरगुती नळ कनेक्शन घेण्यासाठी लोकांमध्ये इच्छुकता निर्माण करणे, कामावर संनियंत्रण ठेवणे, महिलांचा सक्रिय सहभाग मिळविण्यासाठी समाज संगठनाचे उपक्रम राबविणे
- योजनेचा समान लाभ सर्वांना मिळणेबाबत खात्री करणे
- क्षेत्रीय तपासणी यंत्राद्वारे पाणी गुणवत्तेची तपासणी करणे, प्रयोगशाळेत नियमितपणे चाचणी करणे, समुदायामध्ये यासंदर्भातील माहितीचा प्रसार करणे व स्वच्छताविषयक तपासणी करणेबाबत खात्री करणे
- मालमत्ता भौगोलिक (Geo-tagging) प्रणालीत नोंद करणे
- लेखाविषयक विविध दस्तावेज तयार करून त्यांचे जतन करणे
- पाणी पट्टी वसुली दर व देखभाल दुरुस्ती रक्कम निश्चित करून गोळा करणे

**अंमलबजावणी टप्पा –**

- गावातील पाणी पुरवठा सुविधांच्या बांधकामावर, स्त्रोताच्या बळकटीकरणावर, सांडपाण्याच्या पुन:र्वापरावर, जलसंधारणाच्या उपाययोजनावर देखरेख ठेवणे
- जल जीवन मिशन मध्ये सद्यस्थितीतील चालू कामे व नवीन प्रस्तावित केलेल्या कामासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद इतर योजनांमध्ये करणे जेणेकरून, जल संसाधनांची गुणवत्ता, प्रमाण व दिर्घायुषासाठी चालण्यासाठी मदत होईल.
- पंचायत राज संस्थेच्या जल जीवन मिशनच्या अंमलबजावणी संदर्भातील प्रदानित करण्यात आलेल्या भूनिका व जबाबदाऱ्या सक्षमपणे व दिर्घकाळ पार पाडण्यासाठी विविध प्रशिक्षणांच्या माध्यमातून क्षमतांची वृद्धी करणे
- प्रत्यक्ष आलेल्या अनुभव व शिकवणीच्या मदतीने माहिती शिक्षण संवाद साधनांची आखणी करणे व त्यानुसार ग्रामपंचायतीला अंमलबजावणी दरम्यान सहाय्य करणे
- पाण्याच्या संवर्धनासाठी व जनजागृती साठी पाऊस पाणी संकलन व संवर्धन, कृत्रिमरीत्या तांत्रिक पर्यायांचा वापर करून पाण्याची पातळी वाढविणे, पाणी गुणवत्ता, जलजन्य आजार, पाणी बचत व पाण्याचा योग्य वापर, पाण्याची योग्य पद्धतीने साठवणूक व हाताळणी, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताची सुधारणा व शाश्वतता अशा विविध मुद्यांच्या अनुषंगाने प्रचार प्रसिद्धी करून जनजागृती करणे
- तांत्रिक कामे करणाऱ्या संस्थेला निधी वितरीत करण्यापूर्वी त्रयस्थ तपासणी व प्रमाणपत्र प्रदानित करण्यासंदर्भात सहाय्य करणे
- जिल्हा स्तरावरील यंत्रणांना कामाच्या प्रगतीबाबत व अडीअडचणींबाबत अहवाल सादर करणे व वेळोवेळी अवगत करणे
- केंद्र शासन व राज्य शासन यांनी सुरु केलेल्या पाणी मोहिमेदरम्यान गावाला सहाय्य करणे
- स्थानिक तांत्रिक पर्याय शोधणे व त्याबाबत यंत्रणांना अवगत करणे

**देखभाल दुरुस्ती टप्पा –**

- योजना पुर्णत्वानंतर योजनेच्या उपांगांच्या तपासणी व चाचपणी दरम्यान सुलभीकरण करणे
- योजना गावाला हस्तांतरणादरम्यान आवश्यक प्रक्रिया राबविण्यासाठी सुलभीकरण करणे
- योजनेदरम्यान तयार करण्यात आलेल्या मालमत्तांच्या तपशीलाची नोंद ग्रामपंचायतीच्या दप्तरी करण्यासाठी आवश्यकपाऊल उचलणे
- योजनेचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी आढावा बैठकीच्या आयोजनासाठी व सामाजिक लेखापरीक्षणासाठी आवश्यक सहकार्य करणे
- जल जीवन मिशन अंमलबजावणी संदर्भातील यशस्वी गाथा तयार करण्यासाठी शोध घेणे व त्यानुसार दस्तावेजीकरण करणे

५. **मनुष्यबळ (४० गावांच्या मिळून एका समूहासाठी) :**

एक अंमलबजावणी संस्था एकापेक्षा जास्त समूहाकरिता आवश्यक मनुष्यबळाच्या आधारे राज्यातील गावांमध्ये काम करू शकतात. एका समूहामागे खालील मनुष्यबळ असेल. राज्यशासनामार्फ़तमनुष्यबळकमी-जास्तकरणेचेअधिकारराज्यपाणी व स्वच्छ्तामिशनयांनीराखूनठेवलेलाआहे.

| अ.क्र. | पद | एकूण पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्पव्यव स्थापक | १ | समाजकार्यपदविकाकिंवास्थापत्यअभियांत्रिकीविषयातीलपदवी वसमुदायआधारितपाणीपुरवठावस्वच्छताविषयातीलकमीतकमी ५ वर्षाचाअनुभवआवश्यक |
| २ | वरिष्ठ समाज शास्त्रज्ञ (IEC/CB) | १ | समाजकार्य किंवा पाणी व स्वच्छता विषयातील पदविका व माहिती शिक्षण संवाद, क्षमता बांधणी व मनुष्यबळ व्यवस्थापन विषयातील ५ वर्षांचा अनुभव आवश्यक |
| ३ | स्थापत्य / पर्यावरण अभियंता | १ | स्थापत्य किंवा पर्यावरण अभियांत्रिकी विषयातील पदविका / पदवी व समुदाय आधारित पाणी पुरवठा व स्वच्छता / नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन विषयातील कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव आवश्यक |
| ४ | क्षेत्रियसुलभ कर्ता | ४ | समाजकार्यपदविका / पदवीवपाणीवस्वच्छताविषयातीलसामाजिकउपक्रमराबविण्या चाकिमान २ वर्षाचाअनुभववसहभागीयसाधनांच्यावापराबाबतचाअनुभवआव श्यक |
| ५ | लेखापाल | १ | वाणिज्यविषयातीलपदवीवकिमान ३ वर्षाचाअनुभवआवश्यक |
| **एकूण** | | ८ | |

**६. अंमलबजावणी सहाय्य संस्थेसोबत करावयाच्या आर्थिक व्यवहारा संदर्भातील काही विशिष्ट अटी :**

अंमलबजावणी सहाय्य संस्थेच्या मुख्य कामासंबंधी निर्देशक व त्यासंबंधित देयकाच्या अटी पुढीलप्रमाणे .....

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>टप्पा</th><th>उपक्रम</th><th>निर्देशक</th><th>देयक</th></tr>
<tr><td rowspan="4">१.</td><td rowspan="4">पूर्व नियोजन टप्पा (२ महिने)</td><td>अंमलबजावणी सहाय्य संस्थेच्या मनुष्यबळाची व प्रशासकीय व्यवस्थेची उपलब्धता</td><td rowspan="4">• अंमलबजावणी सहाय्य संस्थेने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी, बायोडाटा, प्रमाणपत्रे व छायाचित्र, प्रत्येक कर्मचाऱ्याला देण्यात आलेली जबाबदारी तसेच कार्यालय व प्रशासकीय व्यवस्था उभारल्याबाबतचा आरंभ अहवाल सादर केला जाईल.<br>• नेमून देण्यात आलेल्या गावातील सर्व कुटुंबांची प्राथमिक माहिती गोळा केली जाईल व सदर माहिती ऑनलाईन भरली आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या सर्व गावांमध्ये ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती / पिण्याचे पाणी वापर समूहाची स्थापना अथवा पुन:रुज्जीवन केले आहे<br>• घरगुती नळ कनेक्शान घेण्याबाबत सर्व कुटुंबांची अर्जाच्या माध्यमातून इच्छुकता प्राप्त झाली आहे</td><td rowspan="2">एकूण मानधनाच्या ५ %</td></tr>
<tr><td>घरगुती नळ कनेक्शन संदर्भातील उपलब्ध माहितीची पडताळणी व अंतिमीकरण करणे<br>• घरगुती नळ कनेक्शन संदर्भातील माहिती गोळा करणे<br>• शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार माहितीची नोंद करणे.</td></tr>
<tr><td>ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती व पिण्याचे पाणी वापर गटांची स्थापना / पुन:रुज्जीवन करणे</td><td rowspan="2">एकूण मानधनाच्या १५ %</td></tr>
<tr><td>घरगुती नळ कनेक्शन घेण्यासाठी समाज संगठनाची उपक्रमे राबविणे घरगुती नळ कनेक्शनबाबत लोकांमध्ये इच्छुकता निर्माण करण्यासाठी गृह भेटी, कोपरा बैठका, मोहीमा व प्रात्यक्षिकांचे आयोजन</td></tr>
<tr><th>अ.क्र.</th><th>टप्पा</th><th>उपक्रम</th><th>निर्देशक</th><th>देयक</th></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | **नियोजन टप्पा (३ महिने)** | नेमणूक केलेल्या सर्व गावातील ग्राम पंचायत व ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांचे खालील विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे<br>• जल जीवन मिशन मधील ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व पंचायत राज संस्थेतील सदस्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या<br>• लोकसहभागीय गाव अभ्यास व नियोजन (पी.आर.ए.) | • कामाचा पहिला प्रगती अहवाल सादर केला आहे<br>• ग्रामपंचायत व ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांच्या प्रशिक्षणाचा अहवाल सादर केला आहे.<br>• नेमून देण्यात आलेल्या सर्व गावांचे गाव कृती आराखडे तयार करून त्या संबंधित ग्राम सभा ठरावासहीत अहवाल तालुका / जिल्ह्याला सादर केले आहेत<br>• लोकवाट्याची रक्कम बँक खात्यात जमा केली आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या सर्व गावांत घेण्यात आलेल्या समाज संगठनाच्या उपक्रमाचे अहवाल सादर केले आहेत<br>**(पुढील पानावर)** | **एकूण मानधनाच्या ३५ %** |
| | | नेमून देण्यात आलेल्या सर्व गावांच्या दुय्यम माहितीचे प्रपत्र भरले आहे | | |
| | | नेमून देण्यात आलेल्या सर्व गावांचे गाव कृती आराखडे तयार करून त्या संबंधित ग्राम सभा ठरावासहीत अहवाल तालुका / जिल्ह्याला सादर केले आहेत | | |
| | | पाणी पुरवठा बँक खाते उघडले आहे | | |

| अ.क्र. | टप्पा | उपक्रम | निर्देशक | देयक |
|---|---|---|---|---|
| २. | **नियोजन टप्पा (३ महिने)** | नेमून देण्यात आलेल्या सर्व गावात समाज संगठनाचे खालील उपक्रम राबविणे .....<br>• गावाचा निर्णय प्रक्रियेत सहभाग<br>• कार्यान्वित घरगुती नळ कनेक्शनबाबत लोकांची इच्छुकता निर्माण करणे<br>• लोकवाटा गोळा करणे<br>• पाणी बचत, पाण्याचा योग्य पद्धतीने वापर<br>• पाण्याची योग्य पद्धतीने साठवणूक व हाताळणी<br>• महिलांचा योजनेतील सक्रिय सहभाग<br>• समान पाणी वाटप व सर्वसमावेशकता | | |
| | | लोकवाट्याची रक्कम निश्चित करणे | | |
| | | लोकवाट्याची रक्कम बँकेत जमा करणे | | |
| | | मालमत्ता भौगोलिक प्रणालीत नोंद करणे | | |
| | | लेखाविषयक व इतर नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यासाठी सहाय्य करणे | | |
| | | घरगुती नळ कनेक्शन देण्यासाठी लागणारे साहित्य व कुशल तंत्रज्ञ यांच्या उपलब्धतेबाबत खात्री करणे | | |

| अ.क्र. | टप्पा | उपक्रम | निर्देशक | देयक |
|---|---|---|---|---|
| ३. | **अंमलबजावणी टप्पा (१० महिने)** | नेमून देण्यात आलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायत व ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांचे खालील विषयावरील प्रशिक्षण पूर्ण केले आहे<br>• पाऊस पाणी संकलन व संवर्धन<br>• स्त्रोत बळकटीकरण व सांडपाणी व्यवस्थापन<br>• सामाजिक लेखापरीक्षण<br>• शाश्वत स्वच्छता व स्वच्छता +<br>• पाणी पुरवठा सुविधांचे बांधकाम, पर्यवेक्षण व गुणवत्ता | पहिला टप्पा – (५०% बांधकाम पूर्ण झाल्यावर)<br>• कामाचा दुसरा प्रगती अहवाल सादर केला आहे<br>• ग्रामपंचायत व ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांच्या प्रशिक्षणाचा अहवाल सादर केला आहे.<br>• पाणी पुरवठा व स्वच्छता बांधकामाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या सर्व गावात आयोजित केलेल्या समाज संगठन उपक्रमांचा अहवाल सादर केला आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या गावात त्रयस्थ तपासणी यंत्रणेने केलेल्या तपासणीचे अहवाल सादर केले आहेत<br><br>**(पुढील पानावर)** | **एकूण मानधनाच्या १५ %** |
| | | इतर योजनांसोबत समन्वय साधून पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सविस्तर कामाचा गाव कृती आराखड्यामध्ये समावेश करणे | | |
| | | गावातील पाणी पुरवठा सुविधांच्या बांधकामावर, स्त्रोताच्या बळकटीकरणावर, सांडपाण्याच्या पुन:र्वापरावर, जलसंधारणाच्या उपाययोजनावर देखरेख ठेवणे | | |

| अ.क्र. | टप्पा | उपक्रम | निर्देशक | देयक |
|---|---|---|---|---|
| ३. | **अंमलबजावणी टप्पा (१० महिने)** | सडल पीस व फेरुलचा योग्य प्रकारे वापर करून कनेक्शन देण्यात आल्याबाबत खात्री करणे<br><br>नेमून देण्यात आलेल्या सर्व गावात समाज संगठनाचे खालील उपक्रम राबविणे .....<br>• पाऊस पाणी संकलन व संवर्धन<br>• कृत्रिम पुन:र्भरण<br>• पाण्याची गुणवत्ता<br>• जलजन्य आजार<br>• पाणी बचत व पाण्याचा योग्य पद्धतीने वापर<br>• पाण्याची योग्य पद्धतीने साठवणूक व हाताळणी<br>• पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतामध्ये सुधारणा करणे व शाश्वततेचे उपाय राबविणे<br><br>त्रयस्थ तपासणी यंत्रणेच्या कामादरम्यान सहाय्य करणे<br><br>लेखाविषयक व इतर नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यासाठी सहाय्य करणे | दुसरा टप्पा – (१००% बांधकाम पूर्ण झाल्यावर)<br>• कामाचा तिसरा प्रगती अहवाल सादर केला आहे<br>• ग्रामपंचायत व ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांच्या प्रशिक्षणाचा अहवाल सादर केला आहे.<br>• पाणी पुरवठा व स्वच्छता बांधकामाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या सर्व गावात आयोजित केलेल्या समाज संगठन उपक्रमांचा अहवाल सादर केला आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या गावात त्रयस्थ तपासणी यंत्रणेने केलेल्या तपासणीचे अहवाल सादर केले आहेत | **एकूण मानधनाच्या १५ %** |
| **अ.क्र.** | **टप्पा** | **उपक्रम** | **निर्देशक** | **देयक** |
| ४. | **देखभाल व दुरुस्ती टप्पा (३ महिने)** | नेमून देण्यात आलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायत व ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांचे खालील विषयावरील प्रशिक्षण पूर्ण केले आहे | • कामाचा अंतिम प्रगती अहवाल सादर केला आहे<br>• एकूण हस्तांतरीत करण्यात आलेल्या गावांची संख्या | **एकूण मानधनाच्या १५ %** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | • पाणी पुरवठा सुविधांची देखभाल व दुरुस्ती<br>• पाणी गुणवत्ता संनियंत्रण | • यशस्वी गाथांचे दस्तावेजीकरण<br>• पाणी पुरवठा व स्वच्छता बांधकामाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या सर्व गावात आयोजित केलेल्या समाज संगठन उपक्रमांचा अहवाल सादर केला आहे<br>• नेमून देण्यात आलेल्या गावात त्रयस्थ तपासणी यंत्रणेने केलेल्या तपासणीचे अहवाल सादर केले आहेत | |
| | | योजना हस्तांतरणादरम्यान सहाय्य | | |
| | | योजनेच्या देखभाल दुरुस्ती दरम्यान मदत करणे | | |
| | | यशस्वी गाथांचे दस्तावेजीकरण | | |

७. **अंमलबजावणी सहाय्य संस्थेच्या पात्रतेचे निकष :**

पाणी व स्वच्छता , समाज व्यवस्थापन, पाणी गुणवत्ता, पाऊस पाणी संकलन व पुन:र्भरण, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, क्षमता बांधणी व जनजागृती, सार्वजनिक आरोग्य व स्त्री-पुरुष समानता या क्षेत्रात काम करणाऱ्या अंमलबजावणी सहाय्य संस्थांची निवड **जिल्हा** पाणी व स्वच्छता मिशन कक्षामार्फत केली जाईल.

अंमलबजावणी सहाय्य संस्थांच्या पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे आहेत .....

- कोणतीही अशासकीय संस्था /बचत गट / समुदाय संचलित संस्था / विश्वस्थ संस्था अर्ज करू शकतात
- केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनच्या पोर्टल वर अंमलबजावणी सहाय्य संस्था म्हणून काम करण्यास इच्छुक असल्याबाबत नोंदणी केली आहे
- ज्या अशासकीय संस्थांची / बचत गटाची / समुदाय संचलित संस्थांची / विश्वस्थ संस्थांची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा पब्लिक ट्रस्टची नोंदणी भारतीय ट्रस्ट कायदा १९८२ किंवा कंपनी अधिनियम कलम ८ किंवा जिल्ह्यातील अनुभवी बचत गट यांचा किमान ३ ते ५ वर्षांचा अनुभव असेल
- ज्या संस्था ना नफा ना तोटा या तत्वावर काम करत असतील किंवा त्यांना होणाऱ्या फायद्याचा वापर धर्मादाय कामासाठी केला जात असेल
- संस्थेच्या संचालक किंवा तत्सम पदावर काम करणाऱ्या संस्थेतील व्यक्तीचा वर नमूद केलेल्या क्षेत्रात किमान ३ वर्षे प्रत्यक्ष कामाचा अनुभव असेल
- समाज संगठन उपक्रमामध्ये लोकसहभागीय गाव अभ्यास व नियोजन (पी.आर.ए.) तंत्र व संवादाच्या साधनांचा वापर केल्याचा अनुभव असेल
- मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षणाचे अहवाल, लेखे योग्यरीत्या जतन केलेले असेल. प्राप्तीकर भरलेला असून व वार्षिक अहवाल उपलब्ध आहेत
- संस्थेने किंवा तत्सम यंत्रणेने संबंधित क्षेत्रात चांगले काम केलेले असेल. ज्या संस्थांकडे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असून समुदाय आधारित ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचा अनुभव आहे अशा संस्थांना प्राधान्य दिले जाईल. (संस्थेच्या मेमोरेंडम मध्ये ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्रासंबंधी उपक्रम नमूद केले असतील)
- शासनाने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला किंवा त्रयस्थ यंत्रणेला संस्थेच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी संस्थेची हरकत नसेल
- पंचायत राज संस्थेच्या रचनेची व शासकीय योजनांची माहिती असेल

८. **निवडीसाठी मूल्यमापनाचे निकष :**

**जिल्हा** पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या माध्यमातून विहित नमुन्यात अंमलबजावणी संस्थेच्या निवडीसाठी स्वारस्यासाठी अभिव्यक्ती म्हणून अर्ज मागविण्यात येतील. मूल्यमापन समितीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी केली जाईल.

खालील तक्ता क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार अर्जांची छाननी केली जाईल. कागदपत्रांच्या छाननीसाठी कमाल ८० गुण असतील तसेच तांत्रिक सादरीकरणाला कमाल २० गुण असतील. ज्या संस्थांना कागदपत्रांच्या छाननीदरम्यान किमान ६० गुण प्राप्त होतील त्याच संस्थांना तांत्रिक सादरीकरणासाठी पाचारण केले जाईल. सादरीकरणासाठी निवड

केलेल्या संस्थांनाच सादरीकरणाचे स्वरूप कळविण्यात येईल. ६० व ६० पेक्षा जास्त गुण प्राप्त अंमलबजावणी सहाय्य संस्थांच्या दस्तऐवजीकरणाची पडताळणी झाल्या नंतर ६० किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त पात्र संस्थांचे २० गुणांचे सादरीकरण घेण्यात येईल. या एकुण १०० गुणांच्या आधारे संस्थांची अंतिम निवड सुची जिल्हास्तरावर तयार करण्यात येईल. जिल्हास्तरावरुन पाठवीलेल्या यादीस आवश्यकतेनुसार राज्यस्तरावरील मा. अपर मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती आणि मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

**तक्ता क्रमांक ३ – मूल्यमापनाचे निकष**

| अ.क्र. | निकष | कमाल गुण |
|---|---|---|
| अ. | **कागदपत्रांची पडताळणी** | **८० गुण** |
| १. | **संस्थेचा अनुभव व क्षमता** | **३० गुण** |
| | **संस्थेची स्थापना व अनुभव**<br>३ वर्षापेक्षा कमी – ० गुण<br>३ ते ५ वर्ष – ५ गुण<br>५ ते १० वर्ष – ७ गुण<br>१० वर्षांपेक्षा जास्त – १० गुण | १० गुण |
| | **संस्थेची क्षमता**<br>• पाणी क्षेत्रात समाज संगठन विषयक ग्राम पातळीवर काम केल्याचा अनुभव – १० गुण<br>• जिल्हा स्तरावर सहाय्यकारी संस्था म्हणून काम केल्याचा अनुभव – ५ गुण<br>• संबंधित जिल्ह्यात काम केल्याचा अनुभव – ५ गुण | २० गुण |
| २. | **संस्थेचे मनुष्यबळ** | **३० गुण** |
| | **प्रकल्प व्यवस्थापक – १**<br>संस्थेमध्ये प्रकल्प व्यवस्थापकाची उपलब्धता – २ गुण<br>शैक्षणिक अर्हता : समाजकार्य पदविका किंवा स्थापत्य अभियांत्रिकी विषयातील पदवी – २ गुण<br>अनुभव :<br>• १० वर्षापेक्षा जास्त अनुभव – ४ गुण<br>• ५ ते १० वर्ष – २ गुण<br>• ५ वर्षापेक्षा कमी – ० गुण | ८ गुण |
| | **स्थापत्य / पर्यावरण अभियंता – १**<br>संस्थेमध्ये स्थापत्य किंवा पर्यावरण अभियंत्याची उपलब्धता (पदविका / पदवी) – २ गुण<br>अनुभव :<br>५ वर्षापेक्षा जास्त अनुभव – २ गुण | ४ गुण |

| | | |
|---|---|---|
| | ३ ते ५ वर्ष - १ गुण ३<br>वर्षापेक्षा कमी - ० गुण | |
| | **वरिष्ठ समाज शास्त्रज्ञ (माहिती शिक्षण संवाद / क्षमता बांधणी) – १**<br>संस्थेमध्ये वरिष्ठ समाज शास्त्रज्ञाची समाज विकास किंवा तत्सम अर्हता विषयक उपलब्धता - २ गुण<br>अनुभव :<br>७ वर्षापेक्षा जास्त अनुभव - २ गुण<br>५ ते ७ वर्ष - १ गुण ५<br>वर्षापेक्षा कमी - ० गुण | ४ गुण |
| २. | **संस्थेचे मनुष्यबळ** | **३० गुण** |
| | **क्षेत्रीय सुलभकर्ता – ४**<br>संस्थेमध्ये ४ क्षेत्रीय सुलभकर्त्यांची उपलब्धता - २ गुण<br>शैक्षणिक अर्हता : सर्व क्षेत्रीय सुलभकर्त्यांचे समाज कार्य किंवा तत्सम क्षेत्रातील पदवी / पदविका (एकूण ४ गुण)<br>– १ गुण प्रति क्षेत्रीय सुलभकर्ता<br>अनुभव :<br>• ४ वर्षापेक्षा जास्त अनुभव (एकूण ४ गुण) – १ गुण प्रति क्षेत्रीय सुलभकर्ता<br>• २ ते ४ वर्ष (एकूण २ गुण) – ०.५ गुण प्रति क्षेत्रीय सुलभकर्ता<br>• २ वर्षापेक्षा कमी - ० गुण | १० गुण |
| | **लेखापाल – १**<br>संस्थेमध्ये लेखापालाची उपलब्धता (पदवी) - २ गुण<br>अनुभव :<br>५ वर्षापेक्षा जास्त अनुभव - २ गुण<br>३ ते ५ वर्ष - १ गुण ३<br>वर्षापेक्षा कमी - ० गुण | ४ गुण |
| ३. | **संस्थेची** मागील तीन वर्षांची सरासरी वार्षिकउलाढाल | **२० गुण** |
| | • वार्षिक उलाढाल ७५ लाखापेक्षा जास्त – २० गुण<br>• वार्षिक उलाढाल ५० ते ७५ लाखाच्या दरम्यान – १५ गुण<br>• वार्षिक उलाढाल २० ते ५० लाखाच्या दरम्यान – १० गुण<br>• वार्षिक उलाढाल २५ लाखाच्या आत - ५ गुण | |
| ४. | **सादरीकरण** | **२० गुण** |

**टीप : स्वारस्याची अभिरूची अर्जासहीत पुढील आवश्यक कागदपत्रे जोडणे (कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे, वर्क ऑर्डर, लेखापरीक्षण अहवाल, प्रस्तावित केलेल्या मनुष्यबळाचे बायोडाटावशैक्षणिकअर्हता, अनुभवाचेप्रमाणपत्रासह.**

## ९. निवड व संनियंत्रण :

### ९.१ निवड प्रक्रिया -

राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्षाने तयार केलेल्या निवड सूचीतून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष संस्थेची सेवा घेईल. अंमलबजावणी सहाय्य संस्थांना गावे देताना जिल्हा कृती आराखड्यामध्ये मार्गदर्शक सूचनांनुसार विविध प्रकारची निवडण्यात आलेली गावे व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून देण्यात येतील. अंमलबजावणी सहाय्य संस्थेला जिल्ह्यातील एकाच वेळेस ४० गावे देण्यात येतील.

### ९.२ संनियंत्रण प्रक्रिया -

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाने अंमलबजावणी सहाय्य संस्थेची निवड केल्यावर, संस्थेने ग्रामीण पाणी पुरवठा विभागासोबत समन्वय साधून नेमून दिलेल्या गावांचा प्रकल्प चक्रानुसार कृती आराखडा तयार करावा. सदर कृती आराखड्यात टप्प्यांनिहाय अपेक्षित साध्याचा उल्लेख करावा. राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्षाने सूचित केलेल्या प्रकल्प चक्राला अनुसरून कृती आराखडा तयार करावा.

राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्षाने मार्गदर्शन केल्यानुसार जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाने अंमलबजावणी सहाय्य संस्थेचे संनियंत्रण करावे. करारात नमूद केल्यानुसार प्रस्तावित केलेल्या उपक्रमांचे व कृती आराखड्याचे नियमितपणे संनियंत्रण केले जाईल. अंमलबजावणी सहाय्य संस्थेच्या नेमून दिलेल्या गावातील कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी एक स्वतंत्र संस्था नेमण्यात येईल. नियतकालिक बैठकांच्या आयोजनादरम्यान आवश्यकतेनुसार अंमलबजावणी सहाय्य संस्था कामाचे सादरीकरण करेल. तक्ता क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रकल्प चक्रातील उपक्रमांच्या उद्दिष्ट पुर्ततेनुसार वविशिष्ट अटी सोबत संलग्न केल्यानुसार मानधन वितरीत करण्यात येईल.

यापुर्वी राज्यस्तरावरुन निवड करण्यात आले**ल्या** अंमलबजावणी सहाय्य संस्थांनी प्रस्ताव सादर केल्यास तो ग्राहय धरण्यात येणार नाही. ज्या अंमलबजावणी सहाय्य संस्थांची निवड करण्यात आलेली नाही अशा अंमलबजावणी सहाय्य संस्थांना प्रस्ताव सादर करण्यास संधी देण्यात आलेली आहे.

### १०. स्वारस्याची अभिरुचीच्या अनुषंगाने निविदा सादर करणे -

इच्छुक असलेल्या व पात्रता पूर्ण करणाऱ्या संस्था आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांसहित विहित नमुन्यात अर्ज जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष **जिल्हा परिषद वाशिम** येथे. पात्रता पूर्ण करणाऱ्या व इच्छुक असणाऱ्या सर्व संस्था स्वतंत्र लिफाफ्यात **दिनांक** १७/२/२०२२ **रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत अर्ज सादर करू शकतील.** लिफाफ्यावर " **वाशिम जिल्हयात जल जीवन मिशन अंतर्गत अंमलबजावणी सहाय्य संस्थेची निवड सूचीसाठी अर्ज"** असे नमूद करावे. नमूद केलेल्या कालावधीत अथवा उशिरा प्राप्त झालेले अर्ज, अपूर्ण कागदपत्रे, इमेल द्वारे तसेच अपूर्ण सादर केलेल्या निविदा अमान्य करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

अंमलबजावणी सहाय्य संस्थेच्या निवड प्रक्रियेत काही नियम व अटी शिथिल रद्द प्रक्रिया , करणे अथवा गरज पडल्यास काही नविन योग्य निर्णय घेण्याचे अथवा संपुर्ण प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी राखून ठेवलेला आहे.

*******************.